चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
०१ फेब्रुवारी, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

## चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक ३१/०२/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **रामनगर, घुग्घुस, वरोरा, ब्रम्हपुरी, तळोधी, मुल, राजुरा, कोरपना, शेंगाव** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **१८** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन २० आरोपीतांना अटक करण्यात आले आहे. सदर गुन्हयात एकुण **१७,५९,५६०/—रू.** चा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

---

## चंद्रपर पोलीसांची जुगार खेळणाऱ्यांवर कार्यवाही

**१)पोलीस स्टेशन सिंदेवाही :—**

दिनांक **३१/०१/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **सिंदेवाही** अंतर्गत मौजा नवेगाव येथे ०१ आरोपी ईसम हे सटट्रापटट्रीच्या आकडयावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **सिंदेवाही** येथे अप. क्र. **७७/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०२ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **२३५/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **सिंदेवाही** पोलीस करीत आहे.

---